सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

RNI. NO. MAHBIL /25/A0192

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

वर्ष १ ले | अंक : ३५३ | मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**

**आजचे भाव**

२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १,४९,०००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १,३८,५००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ १,१५,०००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २,३४०/-
भाव प्रती १० ग्राम

**आजचे अभीष्टचिंतन**



श्री. सुनील सोनवणे
अमळनेर



श्री. सुनील अमृतकर
अमळनेर



श्री. डॉ. संजय शहा
अमळनेर

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

## हृदयात भक्ती, डोळ्यांत आनंद...!



अमळनेर : येथील बाजारपेठेत सोमवार, दि. १४ सप्टेंबर रोजी गणेश चतुर्थीनिमित्त फुललेला भक्तीचा लोकसागर. (छायाचित्र : रजनीकांत पाटील)

## अवैधरित्या मुरुम उत्खनन केल्याने डंपरचालकाविरोधात गुन्हा दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील श्री मंगळग्रह मंदिराच्या मागील बाजूस अवैधरित्या मुरुम उत्खनन सुरू असल्याची माहिती महसूल विभागाला मिळाली होती. या अनुषंगाने कारवाईसाठी गेलेल्या महसूल पथकाच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करून डंपर पळवून नेल्याप्रकरणी अमळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अमळनेर पोलीस ठाण्यात सीसीटीएनएस गुरनं. ४७६/२०२६ मोटार वाहन अधि. कलम १८८ प्रमाणे गुन्हा नोंदविला आहे. याबाबत मंडल अधिकारी नरेंद्रकुमार देविदास धनराळे यांनी फिर्याद दिली आहे. आरोपी म्हणून डंपर क्र. एमएच १४ सीपी ७२७५ वरील चालकाविरुद्ध तक्रार देण्यात आली आहे. फिर्यादीत म्हटले आहे, की रविवार, दि. १३ सप्टेंबर रोजी दुपारी सव्वाबारा वाजेच्या सुमारास प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांनी फोनद्वारे श्री मंगळग्रह मंदिरामागे मुरुम उत्खनन सुरू असल्याने तलाठी यांच्यासह जाऊन कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार फिर्यादी व शहर ग्राममहसूल अधिकारी अदिती संतोष जरे हे श्री मंगळग्रह मंदिराच्या दिशेने जात असताना दगडी दरवाजाजवळ एक डंपर येताना दिसल्याने त्यास थांबविण्याबाबत

पान २ वर

# श्री मंगळग्रह मंदिरात गणपती बाप्पांची स्थापना

## दरवर्षीप्रमाणे यंदाही विशेष मान्यवरांच्या हस्ते होणार रोज महाआरती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिर परिसरात गणेश चतुर्थीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही श्रीगणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांच्या मार्गदर्शनाखाली हा उत्सव साजरा केला जातो. सोमवार, दि. १४ सप्टेंबर रोजी मुख्य मानकरी प्रांताधिकारी श्री. मयूर भंगाळे व त्यांच्या धर्मपत्नी डॉ.सौ.करिष्माताई भंगाळे यांच्या शुभ हस्ते सकाळी साडेअकराच्या सुमारास मंदिर परिसरात वाद्यवृंदासह वाजतगाजत विघ्नहर्ता गणपती बाप्पांचे स्वागत करण्यात आले. अतिशय चैतन्यमय व मंगलमय वातावरणात श्रीगणेशमूर्तीची विधीवत स्थापना करण्यात आली. यावेळी 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष करण्यात आला.

श्री मंगळग्रह मंदिरातील गणेशोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे दरवर्षी शहरातील विविध क्षेत्रांतील भाविकांच्या हस्ते श्रीगणेशोत्सवांतर्गत संपूर्ण १० दिवस सकाळी व सायंकाळी गणपती बाप्पांची महाआरती केली जाते. यंदाही शहरातील विविध भाविक या महाआरतीचे विशेष मानकरी आहेत. त्यादृष्टीने संपूर्ण नियोजन करण्यात आले आहे.

मंदिराचे पुरोहित शुभम वैष्णव, वैभव लोकाक्षी, मंदार कुलकर्णी यांनी मंत्रोच्चारात प्रधान संकल्प करून गणपती पूजन व वरुण पूजन केले. त्यानंतर श्रीगणेशमूर्तीची महाआरती झाली.

यावेळी मंगळग्रह सेवा संस्थेचे सचिव सुरेश बाविस्कर, विश्वस्त अनिल अहिरराव, मंगल सेवेकरी पुषंद ढाके तसेच भाविक व मंदिराचे सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



अमळनेर : येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिरात सोमवार, दि. १४ सप्टेंबर रोजी श्रीगणेशमूर्तीची विधीवत स्थापना करताना मुख्य मानकरी प्रांताधिकारी श्री. मयूर भंगाळे व त्यांच्या धर्मपत्नी सौ. डॉ. करिष्माताई भंगाळे. (छायाचित्र : नितेश बारी)



अमळनेर : येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिरात सोमवार, दि. १४ सप्टेंबर रोजी सायंकाळी गणपती बाप्पांची महाआरती करताना विशेष मानकरी नगरसेविका सौ. शोभाताई गढरे. शेजारी संदीप गढरे व त्यांच्या धर्मपत्नी. (छायाचित्र : शरद कुलकर्णी)

# लाड-पागे समितीच्या प्रलंबित नियुक्त्यांसाठी पुन्हा अन्नत्याग आंदोलनाचा इशारा

## आजपासून पालिका कार्यालयाबाहेर बेमुदत आंदोलन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : लाड-पागे समितीच्या शासनमान्य धोरणानुसार प्रलंबित असलेल्या पात्र उमेदवारांच्या नियुक्त्या तसेच इतर मागण्यांवर प्रशासनाकडून अपेक्षित कार्यवाही होत नसल्याचा आरोप करत संघटनेने पुन्हा आंदोलनाचा इशारा दिला आहे. मागण्या सात दिवसांत मार्गी न लागल्यास मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६ पासून पालिकेबाहेर बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू करण्यात येणार असल्याची नोटीस प्रशासनाला देण्यात आली आहे.

लाड-पागे समितीच्या धोरणानुसार प्रलंबित प्रकरणांतील पात्र उमेदवारांना नियुक्त्या मिळाव्यात, तसेच विविध मागण्यांवर तातडीने कार्यवाही करावी, या मागणीसाठी रविवार, दि. २० जुलै २०२६ रोजी पालिकेसमोर बेमुदत अन्नत्याग आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी प्रशासनासोबत झालेल्या चर्चेत प्रलंबित प्रकरणांवर कार्यवाही करण्यासाठी एक महिन्याची मुदत मागण्यात आली होती. पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यासह इतर मागण्यांवरही कार्यवाही केली जाईल, असे प्रशासनाकडून लेखी स्वरूपात कळविण्यात आल्याचा दावा संघटनेने केला आहे.

संबंधित मुदत उलटूनही पात्र उमेदवारांच्या नियुयांबाबत अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. याबाबत दि. २१ व दि. २५ ऑगस्ट २०२६ रोजी पत्र देऊन प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले होते. तरीही प्रश्न प्रलंबितच राहिल्याने संघटनेने आता पुन्हा आक्रमक भूमिका घेतली आहे. प्रशासनाला दिलेल्या नोटिशीत सात दिवसांच्या आत पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करावेत तसेच इतर मागण्यांवर ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा मंगळवार, दि. १५ सप्टेंबरपासून पालिकेबाहेर बेमुदत अन्नत्याग आंदोलन पुन्हा सुरू करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

**प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष**

आंदोलनाचा इशारा देण्यात आल्याने आता प्रशासन या सात दिवसांच्या मुदतीत कोणता निर्णय घेते, तसेच लाड-पागे समितीच्या धोरणानुसार प्रलंबित पात्र उमेदवारांच्या नियुयांचा प्रश्न मार्गी लागतो का, याकडे संबंधित उमेदवारांसह नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## जळगावमार्गे उधना ते पुणे एक्स्प्रेस लवकरच धावणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : खानदेशातील प्रवाशांसाठी दिलासादायक वृत्त असून, उधना ते पुणे (व्हाया नंदुरबार, दोंडाईचा, अमळनेर, धरणगाव, जळगाव, मनमाड) नवीन रेल्वे गाडी लवकरच सुरू होण्याची शक्यता आहे. मुंबईत पार पडलेल्या पश्चिम रेल्वेच्या 'झेडआरयूसीसी' बैठकीत झेडआरयूसीसी सदस्य प्रतीक जैन यांनी ही मागणी मांडली. यावर महाव्यवस्थापक रामाश्रय पांडे आणि प्रमुख मुख्य परिचालन व्यवस्थापक व्ही. ए. मालेगावकर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच गाडी सुरू करण्याचे संकेत दिले. खासदार श्रीमती स्मिताताई वाघ यांनीही या गाडीसाठी पाठपुरावा केला आहे. ही गाडी सुरू झाल्यास खानदेशातून पुण्याकडे जाणाऱ्या प्रवाशांची मोठी सोय होणार आहे. गाडीचे अधिकृत वेळापत्रक लवकरच जाहीर होईल.

# गणपती बाप्पांचे मूळ उगमस्थान अफगाणिस्तानात?

## काबूलमधील 'महाविनायका'चा थक्क करणारा इतिहास!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजपासून गणेशोत्सवाला सुरूवात झाली आहे. 'बीबीसी'ने दि. १८ सप्टेंबर २०२१ रोजी गार्देझ गणपतीबद्दल वृत्त प्रसिद्धीस दिले होते. त्यानुसार १९५६ मधील मे महिन्यातील गोष्ट. भारत सरकारच्या पुरातत्त्व विभागाचे एक पथक अफगाणिस्तानात अभ्यासासाठी गेले होते. काबूलमध्ये असताना या पथकाकडून एक असा शोध लागला, की ज्याने एका भारतीय देवतेच्या कहाणीमध्ये नवी आणि महत्त्वाची भर पडली.

काबूलमध्ये असताना या पथकाच्या सदस्यांना एका गणेशमूर्तीविषयी माहिती मिळाली. संगमरवरात घडवलेली ही मूर्ती विसाव्या शतकात काबूलपासून ७० किलोमीटर दूर असलेल्या गार्देझजवळ सापडली, असे त्यांना सांगण्यात आले. काबूलच्या दर्गाह पीर रतन नाथ येथे ही मूर्ती ठेवली होती आणि शहरातील हिंदू रहिवाशांकडून तिची पूजाही केली जात होती.

**कसा होता काबूलचा 'महाविनायक'?**

अफगाणिस्तानात गेलेल्या १९५६ मधील त्या पथकातील टी. एन रामचंद्रन आणि वाय. डी. शर्मा या पुरातत्त्व अधिकाऱ्यांनी या मूर्तीविषयीचा आपला अहवाल नवी दिल्लीत सादर केला होता. त्यात या मूर्तीचे वर्णन आणि तिच्याखाली लिहिलेल्या शिलालेखातील मजकुराचाही समावेश आहे. पुढच्या काही वर्षांमध्येही अफगाणिस्तान आणि विशेषतः पूर्व अफगाणिस्तानवर संशोधन करणाऱ्या अनेक पुरातत्त्वशास्त्रज्ञांनी या मूर्तीविषयी लिहिले आहे. इतिहासकार आणि पुरातत्त्वशास्त्रज्ञ मधुकर केशव ढवळीकर या मूर्तीचे वर्णन करताना लिहितात, "ही मूर्ती म्हणजे इंडो-अफगाण शैलीचे उदाहरण आहे. कनिष्ठ

पान २ वर

**काबूलच्या गणपतींचे पुढे काय झाले?**

सकर धर आणि गार्देझ गणेशमूर्तींची कहाणी शोधताना मनात एक प्रश्न येतो, की या मूर्ती आज कुठे असतील? दुर्दैवाने त्याविषयी ठोस माहिती कुठेही उपलब्ध नाही. अफगाणिस्तानावर सोव्हिएत आक्रमणानंतर गार्देझची मूर्ती काबूलमधील राष्ट्रीय संग्रहालयात हलविण्यात आल्याचे उल्लेख आहेत. पण १९९६ नंतर तालिबान राजवटीत या संग्रहालयाची नासधूस झाली होती, अनेक मूर्ती नष्ट झाल्या किंवा चोरीला गेल्या. त्यामुळे आता या मूर्तींच्या केवळ फोटोंवरच समाधान मानावे लागते. गणपतींच्या सर्वांत प्राचीन मूर्ती किंवा प्रतिमांमध्ये या मूर्तीचा समावेश केला जातो. आज भारताच्या बाकीच्या भागात ज्या रूपातील गणपतींची पूजा केली जाते, त्यापेक्षा या प्रतिमा काहींना वेगळ्या वाटू शकतात. साहजिकच प्रश्न उभा राहतो, की भारतातून गणपती तेथे गेले, की गणेशपूजेची प्रथा तेथून भारतात आली? गणपतींच्या पूजेची सुरूवात कुठे झाली, याचे नेमके उत्तर देता येणार नाही. पण त्यांच्या उपासनेचे रूप कसे बदलत गेले, याचे पुरावे धार्मिक ग्रंथांमध्येच सापडतात.



## संपादकीय

# वर्गांमधील अंधारलेले वर्तमान

'भारताचे भवितव्य देशातील वर्गांत घडवले जात आहे.' ही ओळ आहे देशाच्या शालेय शिक्षणाबाबत सर्वांत महत्त्वाचा मानला गेलेल्या कोठारी आयोगाच्या अहवालाच्या पहिल्या प्रकरणातील. बरोबर साठ वर्षांपूर्वीचा हा अहवाल आजही बऱ्यापैकी कालसुसंगत आहे. म्हणूनच शिक्षणाबाबतच्या चर्चेत अनेकदा त्याचा दाखला दिला जातो. या अहवालातील पहिली ओळ आठवण्याचे कारण म्हणजे टाटा समाज संशोधन संस्थेच्या शिक्षक प्रशिक्षण केंद्राने केलेल्या अभ्यासाचे. महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, उत्तर प्रदेश, बिहार, पंजाब, छत्तीसगड, आसाम, ओडिशा, मिझोराम या दहा राज्यांतील शाळांतील शिक्षक, अध्यापन आणि शिक्षक प्रशिक्षण यांबाबतचा हा अभ्यास, देशाचे भवितव्य घडविणाऱ्या वर्गांमधील अंधारलेल्या वर्तमानावर बोट ठेवतो. आपल्याकडील शालेय शिक्षणाच्या घसरत चाललेल्या गुणवत्तेकडे अंगुलिनिर्देश करण्यासाठी खरेतर अशा प्रकारच्या कोणत्याही अभ्यासाची गरज नाही; कारण रोज त्याची प्रचिती येत असते. मात्र, याबाबत नेमकी स्थिती कशी आहे, त्यामागील कारणे काय आहेत आणि परिस्थिती सुधारण्यासाठी काय करता येईल, हे पाहण्यासाठी असा अभ्यास महत्त्वाचा असतो. देशातील शिक्षणस्थितीच्या वार्षिक अहवालापासून (असर) केंद्र सरकारच्या जिल्हानिहाय आकडेवारीपर्यंतचे (यू-डायस) विविध अभ्यास आपल्या शिक्षणाच्या गुणवत्तेची इयत्ता दर्शविणारे आहेत. पाचवीच्या विद्यार्थ्यांना दुसरीची पुस्तके वाचता येत नसल्याचे किंवा गणिती आकडेमोड करता येत नसल्यापासून शाळांची संख्या घटत असल्यापर्यंतचे वास्तव हे अभ्यास सातत्याने अधोरेखित करीत आले आहेत. टाटा संस्थेचा ताजा अभ्यासही असेच कटू सत्य मांडणारा आहे. तो गणित, विज्ञान, इंग्लिश, भाषा या विषयांतील शिक्षकांच्या घटत्या संख्येकडे लक्ष वेधतो. मुलांचे शैक्षणिक भवितव्य यावर अवलंबून असल्याने हा अभ्यास गांभीर्याने घ्यायला हवा.

इंग्लिश भाषा शिकविणाऱ्या शिक्षकांची संख्या ३१ टक्क्यांनी कमी, तर अन्य भारतीय भाषा शिकवणारे शिक्षक ३० टक्क्यांनी कमी असल्याचे समोर आले. विशेष म्हणजे जे शिक्षक गणित शिकवतात, त्यांपैकी जवळ जवळ निम्म्यांनी (४९ टक्के) त्यांच्या पदवी स्तरावर या विषयाचे शिक्षणच घेतलेले नाही. म्हणजे दहावी, बारावी या इयत्तांपर्यंतच्या गणिताच्या पुंजीवरच ते विद्यार्थ्यांना गणित शिकवत आहेत. या साऱ्याचा अर्थ एवढाच, देशातील शाळांत प्रमुख विषयांच्या जवळ जवळ एक तृतीयांश जागा रिक्त आहेत. या शाळा सरकारी असतील, तर तेथे भरती प्रक्रियेला अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागते. या तुलनेत खासगी शाळांत चटकन शिक्षक भरले जातात; परंतु तेथे शिक्षक शाळा सोडून (अन्य शाळांत) जाण्याचे प्रमाण लक्षणीय (शहरी भागात १४ टक्के, आणि ग्रामीण भागात १८ टक्के) आहे. त्यामुळे शिक्षकांची उणीव कायम राहते. एकीकडे दरवर्षी सुमारे सात लाख उमेदवार शिक्षणशास्त्रातील पदवी घेऊन बाहेर पडून नोकरीच्या शोधात असताना, दुसरीकडे शाळांतील शिक्षकांच्या ३३ टक्के जागा रिक्त राहणे हा विरोधाभास म्हणायला हवा. शिक्षक भरती परीक्षांतील अनियमितता, गैरप्रकार यांमुळे सरकारी वा अनुदानित शाळांतील रिक्त जागांत वाढ, तर खासगी शाळांत तुटपुंज्या वेतनावर पात्र शिक्षकांची होणारी बोळवण हे या विरोधाभासाचे वास्तव चित्र.

यापूर्वीच्या अहवालांतून समोर आलेली ही बाब टाटा संस्थेच्या अभ्यासातही ठळकपणे दिसली आहे. गेल्या पाच वर्षांत विद्यार्थ्यांची संख्या दीड कोटीने कमी झाली आहे. त्यामागे जननदर कमी होण्याचे कारण असले, तरी शिक्षणाच्या परिघाबाहेर मुले आहेत, हे नाकारता येत नाही. शिक्षिकांच्या वाढलेल्या प्रमाणाचा (५१ टक्क्यांवरून ५४ टक्के) या अभ्यासातील उल्लेख महिला सबलीकरणासाठी महत्त्वाचा आहे. ही बाब वगळता बहुतेक निरीक्षणे चिंताजनक आहेत. एकशिक्षकी शाळांची वाढती संख्या हे त्यांपैकी एक निरीक्षण. या शाळा सरकारी आहेत. शिक्षक भरतीची रखडत असलेल्या प्रक्रियेमुळे उमेदवार निराश होत असल्याचेही हा अभ्यास सांगतो. २०४७ मध्ये देशाला पूर्णतः विकसित करण्याचे स्वप्न पाहत असताना, हा विकास ज्यांच्यामुळे होणार आहे, त्या पिढीच्या शिक्षणाची अशा प्रकारे दुरवस्था झाली आहे. ती दूर केली नाही, तर देश विकसित कसा होणार? ज्या वर्गांत देशाचे भवितव्य घडत आहे, ते वर्ग अंधारलेले असून चालणार नाही. हा अंधार दूर करण्यासाठी वेळीच उपाय झाले नाहीत, तर भवितव्यही अंधारलेले असेल.

# गणरायांच्या स्वागताला स्वच्छतेची साथ; पालिकेतर्फे विशेष मोहीम

## गणेश मंडळ परिसर, विसर्जन मार्गांसह प्रमुख ठिकाणांची स्वच्छता; नागरिकांना सहकार्याचे आवाहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी ठेवण्यासाठी येथील पालिकेच्या स्वच्छता विभागातर्फे 'गणपती बाप्पांना स्वच्छतेची साथ' या उपक्रमांतर्गत विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. गणेश मंडळ परिसर, प्रमुख रस्ते, सार्वजनिक ठिकाणे तसेच विसर्जन मार्गांची विशेष साफसफाई करण्यात येत आहे.

नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुख्याधिकारी गणेश शिंदे यांच्या सूचनेनुसार पालिका प्रशासनाने गणेशोत्सवासाठी स्वच्छता व्यवस्थेचे नियोजन केले आहे. नियमित झाडू काम, कचरा संकलन व विल्हेवाट, परिसर स्वच्छता तसेच आवश्यकतेनुसार जंतुनाशक फवारणीवर भर देण्यात येत आहे. या मोहिमेचे नियोजन व अंमलबजावणी स्वच्छता निरीक्षक संतोष जाधव, स्वच्छता निरीक्षक किरण कंडारे व संतोष माणिक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

स्वच्छता कर्मचारी व मुकादमांच्या माध्यमातून शहरातील विविध भागांमध्ये स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्यात आली आहे. निर्माल्य स्वतंत्रपणे जमा करण्याचे आवाहन गणेशोत्सवाच्या काळात सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकता निर्माल्य निर्धारित ठिकाणी जमा करावे, प्लास्टिकचा अनावश्यक वापर टाळावा आणि गणेश मंडळांनी परिसराची स्वच्छता राखावी, असे आवाहन नगरपरिषदेने केले आहे. उत्सवाच्या काळात नागरिकांनी प्रशासनाच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे, असेही सांगण्यात आले आहे.



# रूबजीनगरकडील रस्त्याची अक्षरशः चाळण!

## श्री खडेश्वर महादेव मंदिराजवळ वाहनचालकांची जीवघेणी कसरत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील रूबजीनगरमार्गे जाणाऱ्या रस्त्याची पावसामुळे अक्षरशः चाळण झाली आहे. श्री खडेश्वर महादेव मंदिराजवळ रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून, त्यात पावसाचे पाणी साचल्याने हा मार्ग रस्ता राहिला की चिखलाचे तळे, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे. पावसाच्या पाण्यासोबत माती आणि चिखल रस्त्यावर आल्याने वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत धरून मार्गक्रमण करावे लागत आहे. विशेषतः दुचाकीस्वारांसाठी हा मार्ग धोकादायक बनला आहे. पाण्याखाली खड्डे लपल्याने वाहन घसरून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शहराच्या हद्दीत असूनही या रस्त्याची अशी अवस्था झाल्याने संबंधित यंत्रणेच्या देखभाल-दुरुस्तीच्या कामावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांकडून कर वसूल करणाऱ्या यंत्रणेला नागरिकांना सुरक्षित रस्ता देणे जमत नाही का? असा सवाल आता उपस्थित होत आहे.



*अमळनेर : शहरातील रूबजीनगरमार्गे जाणाऱ्या रस्त्याची पावसामुळे झालेली चाळण.*

गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांची या मार्गावर मोठी वर्दळ असताना रस्त्याची ही दुरवस्था अधिकच त्रासदायक ठरत आहे. हा रस्ता पुढील गावांना सोडला जाणारा असल्या कारणाने ग्रामीण भागातून कामानिमित्त शहरात येणाऱ्यांची संख्या भरपूर आहे. पुढे देखील अनेक खड्डे असल्या कारणाने जीवघेणी कसरत करावी लागते मात्र काही भागात मोठमोठे खड्डे आहेत पावसाच्या पाण्याने भरल्याने त्या ठिकाणी अंदाज येत नसल्याने अनेक वाहने खड्ड्यात जाऊन पडतात केवळ तात्पुरती खडी टाकून खड्डे बुजविण्याऐवजी रस्त्याची कायमस्वरूपी दुरुस्ती करून पावसाच्या पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

**प्रशासन कधी जागे होणार?**

या रस्त्याची अवस्था संबंधित प्रशासनाच्या निदर्शनास येत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. एखादा मोठा अपघात झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल करत तातडीने या रस्त्याची दुरुस्ती व्हावी, अशी मागणी होत आहे.

### अंतुर्ली-रंजाणे परिसरात बिबट्याचा हल्ला;

# वासरू, गोऱ्हा जखमी झाल्याने दगावले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील अंतुर्ली-रंजाणे परिसरातील नंदगाव शिवारालगतच्या घुंगऱ्या नाला भागात बिबट्याचा वावर वाढला आहे. सोमवार, दि. १४ सप्टेंबर रोजी पहाटेच्या सुमारास बिबट्याने वासरू व गोऱ्ह्यावर हल्ला करून जखमी केले. त्यात हे दोघे दगावल्याची घटना समोर आली आहे. या घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी करून पंचनामा केला.

घटनास्थळी आढळलेल्या ठशांवरून तसेच पंजाच्या खुणांवरून बिबट्याचा वावर असल्याचे दिसून आल्याचे वन अधिकारी गुलाब पिंजारी यांनी सांगितले. यावेळी मनीषाताई मोरे आणि योगेश पाटील हेही त्यांच्यासमवेत उपस्थित होते. सोमवार, दि. १४ सप्टेंबर रोजी पहाटे पाच ते साडेपाच वाजेच्या सुमारास घुंगऱ्या नाला परिसरात गायीचे वासरू आणि एका गोऱ्ह्यावर हल्ला झाल्याचे आढळून आले. सकाळी सात वाजता शेतकरी उमेश पारधी हे गोऱ्ह्यांना चारा-पाणी देण्यासाठी गेले असता त्यांच्या निदर्शनास हा प्रकार आला. दरम्यान, काही नागरिकांच्या म्हणण्यानुसार गुरुवार, दि. १० सप्टेंबर रोजी पोळ्याच्या दिवशीही याच परिसरात बिबट्या दिसल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये काही प्रमाणात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. उमेश पारधी यांनी घटनेची माहिती वन विभागाला दिल्यानंतर अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. त्यांनी पाहणी करून पंचनामा केला.

घटनास्थळी आढळलेल्या ठशांसह अन्य खुणांवरून बिबट्याचा वावर असल्याचा अंदाज वन विभागाने व्यक्त केला. त्यानंतर वन विभागाच्या पथकाने परिसरात गस्त घातली. मात्र, बिबट्या आढळून आला नाही. सायंकाळी पुन्हा या परिसरासह आजूबाजूच्या भागात गस्त घालण्यात येणार असून, बिबट्याच्या वावराच्या आणखी खुणा आढळल्यास कॅमेरा ट्रॅप लावण्यात येणार असल्याचे वन विभागाने सांगितले. बिबट्या एका ठिकाणी कायमस्वरूपी थांबत नसतो. त्यामुळे नागरिक व शेतकऱ्यांनी घाबरून न जाता सतर्कता बाळगावी. परिसरात बिबट्या अथवा त्याच्या वावराच्या खुणा आढळल्यास तातडीने वन विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन वन अधिकारी गुलाब पिंजारी यांनी केले आहे.

# प्रताप महाविद्यालयाच्या 'बी. व्होक. फूड प्रोसेसिंग'च्या दोन विद्यार्थ्यांची मुंबईच्या नामांकित कंपनीत निवड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळ संचलित प्रताप महाविद्यालयाच्या बी.व्होक. फूड प्रोसेसिंग विभागातील रोहित अंकुश पाटील व नयन अनिल पाटील या विद्यार्थ्यांची मुंबईतील RETRANZ INFOLAB PVT. LTD. या प्रसिद्ध फूड कंपनीत 'प्रॉडक्शन एक्झिक्युटिव्ह' या पदावर नियुक्ती झाली आहे. निवड झालेल्या दोन्ही विद्यार्थ्यांना वार्षिक तीन लाख ६९ हजार रुपयांचे वार्षिक पॅकेज मिळाले आहे.



*अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळ संचलित प्रताप महाविद्यालयाच्या बी.व्होक. फूड प्रोसेसिंग विभागातील रोहित अंकुश पाटील व नयन अनिल पाटील यांचा सत्कार करताना प्र.-प्राचार्य प्रा. डॉ. एच. डी. जाधव. शेजारी उपप्राचार्य प्रा. डॉ. तोरवणे, प्रा. डॉ. एस. डी. बागूल तसेच प्रा. सुचित्राताई रत्नपारखी, प्रा. रागिणीताई सैदाणे व प्रा. तनयाताई जोशी आदी.*

त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयातर्फे त्यांचा नुकताच प्र.-प्राचार्य प्रा. डॉ. एच. डी. जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपप्राचार्य प्रा. डॉ. तोरवणे, प्रा. डॉ. एस. डी. बागूल तसेच प्रा. सुचित्राताई रत्नपारखी, प्रा. रागिणीताई सैदाणे व प्रा. तनयाताई जोशी उपस्थित होते. खानदेश शिक्षण मंडळाच्या सर्व विश्वस्त मंडळाने या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या (B.Voc) माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना थेट कॉर्पोरेट क्षेत्रात मोठ्या संधी मिळत असल्याबद्दल पालकांनीही महाविद्यालयाचे आभार मानले आहेत.

# अवैधरित्या मुरुम उत्खनन केल्याने डंपरचालकाविरोधात गुन्हा दाखल

**पान १ वरून :** इशारा दिला. मात्र, चालकाने इशाऱ्याकडे दुर्लक्ष करून डंपर पळवून नेले. पाठलाग करीत असताना अमळनेर बसस्थानकाच्या अलीकडे डाव्या बाजूस डंपर टाकल्याने पुन्हा इस्लामपुराजवळील दुर्गा हॉस्पिटलजवळ अडविण्याचा प्रयत्न केला असताना देखील चालकाने डंपर थांबविले नाही. त्यावेळी सदर डंपरचा क्रमांक एमएच १४ सीपी ७२७५ असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर सदर डंपर चालकास समजावून सांगूनही त्याने त्याच्या ताब्यातील डंपर न थांबवता त्याने वेगात व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून पळवून नेल्याने त्याच्याविरुद्ध फिर्याद देण्यात आली आहे. सदर फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार मिलिंद सोनार तपास करीत आहेत.

# गणपती बाप्पांचे मूळ उगमस्थान अफगाणिस्तानात?

**पान १ वरून**

दर्जाच्या संगमरवरी दगडापासून बनविलेली असून, ती मूर्ती २४ इंच उंच आणि १४ इंच रुंद आहे."

या मूर्तीमध्ये देवता उभी राहिली आहे. तिचे मस्तक हत्तीचे आहे आणि सोंड तुटली असली, तरी ती डावीकडे वळल्याचे दिसून येते. या देवतेला चार भूजा आहेत, पण त्याही भंगलेल्या अवस्थेत आहेत. त्याने कंबरेला वाघाचे कातडे बांधले आहे तर गळ्यात साप जानव्यासारखा परिधान केला आहे.

मूर्तीचे पोट मोठे आहे, जे 'लंबोदर' या गणपतींच्या वर्णनासारखेच आहे. पीळदार दंड आणि खांद्यांचा आकार इंडो-ग्रीक शैलीचा प्रभाव दाखवतो. तर त्याने परिधान केलेला मुकुट पर्शियन (इराणी) शैलीतील म्हणजे रिबिनीने बांधला जाणारा आहे. त्यामुळेच ही मूर्ती म्हणजे पुरातत्त्वशास्त्रज्ञ आणि कलाइतिहासकारांना महत्त्वाची वाटते. कारण ती भारतीय, गांधार (इंडो-ग्रीक) आणि पर्शियन संस्कृतींच्या मिलाफाचे प्रतीक आहे.

**काबूलच्या महाविनायकाची मूर्ती किती जुनी?**

ही मूर्ती कोणत्या देवतेची आहे, हे कसे स्पष्ट झाले? तर या मूर्तीच्या खालच्या भागात दोन ओळींचा एक शिलालेख आहे. इतिहासकार आणि शिलालेखांचे अभ्यासक डीसी सिरकार यांनी त्याचा अभ्यास केला होता. ते लिहितात, की हा शिलालेख संस्कृत भाषेत आणि ब्राह्मी सिद्धमात्रिका लिपीत लिहिलेला आहे. त्यात काही व्याकरणाच्या चुकाही आहेत आणि काही शब्दांचा अर्थ फोटोंवरून लावणे कठीण जाते. पण या शिलालेखाचा सारांश काहीसा असा आहे- 'महाराजाधिराज शाही खिंगल याने त्याच्या राज्याच्या आठव्या वर्षी महाज्येष्ठ महिन्याच्या शुक्ल पक्षातील त्रयोदशीला विशाखा नक्षत्रावर, सिंह लग्न असताना या महाविनायकाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली.'

हा खिंगल राजा नेमका कोण, याविषयी मात्र पुरातत्त्वशास्त्रज्ञांमध्ये एकमत नाही. कारण या प्रदेशात हे नाव धारण करणारे किमान दोन राजे पाचव्या आणि सहाव्या शतकात होऊन गेल्याचे पुरावे आहेत. त्या काळात येथे हूणांचे राज्य होते. मूर्तीची शिल्पशैली आणि लिपी यांचा विचार करता ती पाचव्या ते सहाव्या शतकातील असावी, असा अंदाज तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. एम. के. ढवळीकर यांच्या मते ही मूर्ती पाचव्या शतकाच्या उत्तरार्धातील असावी. पण काबूलमध्ये पुरातत्त्वशास्त्रज्ञांना केवळ एकच मूर्ती सापडली नव्हती. १९५६ मध्ये सादर झालेल्या अहवालात आणखी एका मूर्तीचा उल्लेख आहे.

काबूलच्या उत्तरेला दहा मैलांवर सकर धर (शंकर धर) येथे ही दुसरी मूर्ती सापडली होती आणि ती काबूलच्या राष्ट्रीय संग्रहालयात आणण्यात आली होती. ती चौथ्या शतकाच्या मध्यातील असावी, असा अंदाज ढवळीकरांनी व्यक्त केला आहे.

**गणपतींचे रूप कसे बदलत गेले?**

गणपतींच्या आरतीनंतर जे देवे म्हटले जातात, त्यातील मंत्र म्हणजे ऋग्वेदातील काही ऋचा आहेत. साधारणपणे देवे म्हणताना पहिला जो मंत्र उच्चारला जातो, त्यात गणपतींचा उल्लेख आहे. 'गणानां त्वां गणपतिं हवामहे' हा तो मंत्र तुम्हीही कधीतरी ऐकला असेल.

पण ऋग्वेदात उल्लेख झालेले हे गणपती म्हणजे हत्तीचे मस्तक असलेले आजचे गजानन नाही, तर बृहस्पती ही देवता आहे. ऋग्वेदात प्रामुख्याने कुबेर, इंद्र, अग्नी अशा देवांची वर्णने आहेत. पण ऋग्वेदानंतरच्या काळातील ग्रंथांमध्ये अनेक देवतांचे उल्लेख येतात.

इसवीसन पूर्व पाचव्या शतकात लिहिलेल्या धार्मिक विधींविषयीच्या 'मानवगृह्यसूत्र' या ग्रंथात चार विनायकांचा उल्लेख आहे. हस्तीमुख, वक्रतुंड, दातिन, लंबोदर अशा चार विनायकांचेच पुढे एका विनायकात रूपांतर झालेले दिसून येते, असा अंदाज अनेक अभ्यासकांनी मांडला आहे. पुरातत्त्वशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्राचे अभ्यासक कुरुश एफ दलाल सांगतात, "आरंभीच्या काळातील गणपती विघ्नहर्ता नाही, विघ्नकर्ता आहे. त्याला भाव दिला नाही, तर तो तुमची वाट लावेल, म्हणून आधी त्याला प्रसन्न करायला हवे. पण काळाबरोबर हळूहळू गणपतींचे रूप बदलत गेले."

गणपतींच्या रूपात आणि त्याच्या पूजेच्या पद्धतींमध्ये कसा बदल होत गेला, याविषयी लेखक आणि पुराण-कथांचे अभ्यासक देवदत्त पटनायक यांनी '९९ थॉट्स ऑन गणेशा' या पुस्तकात लिहिले आहे.पटनायक सांगतात, की आधी हिंदू लोक यज्ञ करायचे, मंत्र म्हणून देवांना आवाहन करायचे आणि आगीत हवीर्भाग अर्पण करायचे. पण हळूहळू उपासनेचा नवा मार्ग, म्हणजे मूर्तीची पूजा सर्वसामान्यांमध्ये लोकप्रिय होऊ लागला.

"इसवीसन पूर्व ३२६ मध्ये अलेक्झांडरने (सिकंदर) भारतावर आक्रमण केले आणि त्यानंतर काही वर्षांत मौर्य साम्राज्याचा देशभर विस्तार झाला. या काळातील अनेक इंडो-ग्रीक नाण्यांवर हत्तीच्या किंवा हत्तीसदृश प्रतिमा कोरलेल्या दिसून येतात. त्यामुळे अनेकांना ग्रीक संस्कृतीच्या प्रभावातून गणेशाची मूर्ती आकाराला आली असावी, असे वाटते."

पटनायक पुढे लिहितात, की भारतात येण्याआधी ग्रीकांनी इजिप्तवर ताबा मिळवला होता, आणि इजिप्तमध्ये अशा मानवी शरीर आणि प्राण्याचं धड असलेल्या देवतांच्या अनेक प्रतिमा आढळून येतात. या मिश्र प्रभावातून हत्तीचं मस्तक असलेल्या देवतेची पूजा सुरू झाली असावी.

"पुढे रोमन साम्राज्याच्या काळात व्यापारामुळे तेही भारताच्या संपर्कात आले. रोमनांची देवता जानस आणि गणपती यांच्या गुणधर्मांमध्येही बरंच साम्य आहे. विघ्न आणि बदलाचे ते प्रतीक आहेत.

"ग्रीक, रोमन आणि इजिप्शियन देवतांचा भारतीय विचारांवर आणि गणेशाच्या संकल्पनेवर परिणाम झाला की नाही याचा केवळ अंदाजच लावू शकतो." असं पटनायक सांगतात.

आठव्या शतकात शंकराचार्यांच्या काळात हिंदू धर्मात अनेक बदल झाले आणि शिव, शक्ती, वैष्णव, सूर्य आणि गणेश या पाच पंथांचा प्रभाव दिसून येऊ लागला.

दहाव्या शतकापासून गणपत्य पंथांचा प्रसार वाढत जाताना दिसतो.

कुरुश दलाल सांगतात, विशेषतः पश्चिम आणि दक्षिण भारतात गणपतीची मंदिरं उभी राहिली आणि या देवतेचं रूप आणखी बदलत गेलं. गणपतीही सात्विक झाला. महाराष्ट्रात तो पेशव्यांचा आणि ब्राह्मणांचा मुख्य देव झाला आणि शिव-पार्वतीचा मुलगा व्हेजिटेरियनही झाला."

**गणपती आणि संस्कृतींचा मिलाफ**

बौद्ध धर्माच्या काही पंथांत विशेषतः तिबेटातील वज्रयान पंथातही विनायकाचे उल्लेख विघ्नकर्ता म्हणूनच येतात आणि त्याच्यावर बोधिसत्व अवलोकितेश्वराने मिळविलेल्या विजयाच्या कहाण्याही आहेत. बौद्ध धर्मासोबत ही देवता पूर्वेकडील देशांमध्ये, अगदी जपानमध्येही पोहोचली आहे.

**श्रीगणेशांच्या ठायी संस्कृतीचा हा मिलाफ** अभ्यासकांना विशेष महत्त्वाचा वाटतो. त्याविषयीच आम्ही इतिहासाचे अभ्यासक आनंद कानिटकर यांच्याशी बातचीत केली. कानिटकर प्रदाय हेरिटेज मॅनेजमेंट सर्व्हिसेसचे संचालक आहेत आणि त्यांनी अफगाणिस्तानच्या बामियान आणि हेरातमध्ये युनेस्कोसाठी प्रकल्पांवर कामही केले आहे.

ते सांगतात, "भारताचा इतिहास बघताना, नेहमी हे लक्षात घेतले पाहिजे, की तेव्हा आतासारख्या सीमारेषा नव्हत्या. मगधपासून गांधारमधील तक्षशिला हा भाग व्यापारीमार्गांनी आधीपासून जोडलेला होता. गांधारपासून उत्तर अफगाणिस्तानातील बाल्खपर्यंतचा प्रदेशही व्यापारीमार्गांनी जोडलेला होता. काही वेळा हा भाग एका अंमलाखालीही आला होता.

त्यामुळे तेथे भारतीय संस्कृतीच्या खाणाखुणा सापडणे ही आश्चर्याची गोष्ट नाही. बाल्खपासून ते पाटलीपुत्रपर्यंत राज्य करणाऱ्या कुशाण राजांच्या नाण्यांवर इराणी, भारतीय आणि ग्रीक देवताही दिसून येतात याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. "प्राचीन इतिहास पाहिल्यावर असे दिसून येते, की कुठलीही गोष्ट 'वॉटरटाईट' कप्प्यांमध्ये विभागलेली नव्हती.

अफगाणिस्तानात तर पश्चिमेकडून येणारी इराणी संस्कृती, स्थानिक ग्रीक राजांमुळे आलेली ग्रीक संस्कृती, उत्तरेतून येणारी मध्य आशियाई संस्कृती आणि आग्नेयेकडून येणारी भारतीय संस्कृती या प्रवाहांचा संगम झाल्याचे दिसून येते. त्यामुळे गार्देजमधील या गणेश मूर्तीवर ग्रीक आणि इराणी प्रभाव दिसून येतात.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# पिता चलाते थे आटा की चक्की, सरकारी स्कूल से की पढ़ाई

## ‘पीसीएस’ के बाद यूपीएससी क्रैक कर बने ‘आयएएस’

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आईएएस अधिकारी रिंकू सिंह राही मूल रूप से अलीगढ़ के डोरी नगर के रहने वाले हैं। शुरुआत में उनके परिवार की आर्थिक स्थित अच्छी नहीं थी। उनके पिता आटा चक्की चलाते थे। पढ़ाई के ज्यादा संसाधन मौजूद नहीं थे।

कुछ आईएएस ऑफिसर खूब चर्चा में रहते हैं। इनका नाता विवादों से खूब रहता है। इन्हीं में से एक आईएएस ऑफिसर हैं रिंकू सिंह राही। उत्तर प्रदेश के आईएएस रिंकू सिंह राही ने हाल ही में केंद्र सरकार को पत्र लिखकर अपना कैडर बदलने की मांग की थी। उन्होंने आरोप लगाया कि उत्तर प्रदेश की भ्रष्ट नौकरशाही उन्हें स्वतंत्र रूप से काम करने नहीं दे रही है। इसलिए वो चाहते हैं कि उन्हें किसी और राज्य या कैडर दे दिया जाए। वर्तमान में वो जालौन में एसडीएम (न्यायिक) के पद पर तैनात हैं। लेकिन आज हम आपको उनके आईएएस बनने की कहानी बताएंगे, जो काफी दिलचस्प है। क्योंकि वो आईएएस बनने से पहले पीसीएस अधिकारी थे। लेकिन उन्होंने अपने मेहनत के दम पर यूपीएससी की सिविल सेवा परीक्षा दी और उसे क्रैक कर आईएएस बने। चलिए आज सक्सेस स्टोरी में बात आईएएस अधिकारी रिंकू सिंह राही की।

### कौन हैं आईएएस रिंकू सिंह राही

आईएएस अधिकारी रिंकू सिंह राही मूल रूप से अलीगढ़ के डोरी नगर के रहने वाले हैं। शुरुआत में उनके परिवार की आर्थिक स्थित अच्छी नहीं थी। उनके पिता आटा चक्की चलाते थे। पढ़ाई के ज्यादा संसाधन मौजूद नहीं थे।

### सरकारी स्कूल से १२ वीं तक की पढ़ाई

पढ़ाई-लिखाई की बात करें, तो रिंकू की पढ़ाई-लिखाई सरकारी स्कूल से हुई थी। प्रारंभिक पढ़ाई उन्होंने बेसिक शिक्षा विभाग के परिषदीय स्कूलों से की। इंटर भी सरकारी कॉलेज से पास किया। रिंकू पढ़ाई-लिखाई में काफी अच्छे थे। उन्होंने इंटरमीडिएट बोर्ड परीक्षा अच्छे नंबरों से पास की। अच्छे नंबरों के चलते रिंकू को स्कॉलरशिप मिली।

**सक्सेस स्टोरी**

### बीटेक के बाद पीसीएस के लिए चयन

इसके बाद उन्होंने टाटा इंस्टीट्यूट से बीटेक किया। फिर वो प्रतियोगी परीक्षाओं की तैयारी करने लगे। उनका सपना था कि वो सिविल सर्विसेज में जाएं। साल २००८ में उनका चयन पीसीएस के लिए हो गया। पहली तैनाती यूपी के मुजफ्फरनगर में समाज कल्याण अधिकारी के रूप में मिली। अपने पहली पोस्टिंग में उन्हें जानलेवा हमला का सामना करना पड़ा।

### हमले में गवानी पड़ी एक आंख

बताते हैं कि समाज कल्याण अधिकारी रहते रिंकू सिंह राही ने ८३ करोड़ रुपए का घोटाला उजागर किया था। इसके चलते उन पर जानलेवा हमला हो गया था। रिंकू सिंह को सात गोलियां लगी थीं। इस हमले में पाए जख्मों के निशान रिंकू सिंह राही के चेहरे पर आज भी देखे जा सकते हैं। उस हमले में उन्हें अपनी एक आंख भी गंवानी पड़ी थी।

### छात्रों ने यूपीएससी के लिए किया प्रेरित

स्वस्थ होने के बाद रिंकू सिंह राही को भदोही का जिला समाज कल्याण अधिकारी बनाया गया। वहां से एक बार एक श्रावस्ती, ललितपुर और हापुड़ में उनकी तैनाती रही। बाद में उन्हें प्रदेश सरकार द्वारा संचालित कोचिंग संस्थान के डायरेक्टर के पद पर नियुक्ति दी गई। बताया जाता है कि यहीं के छात्रों ने उन्हें यूपीएससी की तैयारी करने के लिए प्रेरित किया। अपने विद्यार्थियों की बात मानकर रिंकू सिंह राही ने यूपीएससी की तैयारी की। साल २०२१ की यूपीएससी परीक्षा दी और सफल रहे। रिंकू सिंह राही ने यूपीएससी-२०२१ की परीक्षा में ६८३वीं रैंक हासिल की थी।

### दे चुके हैं अपने पद से इस्तीफा

जैसा कि उनका नाता विवादों से खूब रहा। रिंकू सिंह राही ने मार्च २०२६ में अपने पद से इस्तीफा दे दिया। पता चला कि रिंकू तैनाती न मिलने से नाराज थे। यूपी कैडर के आईएएस रिंकू सिंह राही ने अपने विस्तृत पत्र में आरोप लगाया था कि उन्हें लंबे समय से न तो पोस्टिंग दी जा रही थी और न ही कोई गरिमापूर्ण काम सौंपा जा रहा था। उन्होंने लिखा था कि वे संबद्ध हैं, लेकिन उन्हें जनसेवा का मौका नहीं दिया गया। राही का कहना था कि हालांकि उन्हें वेतन मिलता रहा, लेकिन काम करने और जनसेवा के अवसर से वंचित रखा गया। उन्होंने इसे नैतिक निर्णय बताते हुए इस्तीफा दिया था। हालांकि अप्रैल २०२६ में उन्होंने अपना तकनीकी इस्तीफा वापस ले लिया था। हाल ही में उन्हें जालौन में बतौर संयुक्त मजिस्ट्रेट (एसडीएम) तैनात किया गया था।



# साखर सोडून गूळ खाणे खरोखर सुरक्षित?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

साखरेऐवजी गूळ वापरला म्हणजे रक्तातील साखर नियंत्रणात राहते, असा अनेकांचा समज असतो. पण हा समज कितपत योग्य आहे? गूळ नैसर्गिक असला तरी तो शरीरातील रक्तातील साखरेवर परिणाम करू शकतो का? एका रुग्णाच्या बाबतीत गूळ खाल्ल्यानंतर तीन महिन्यांत HbAlc ७.२ टक्क्यांवरून ८.५ टक्क्यांपर्यंत वाढल्याचे समोर आले. त्यामुळे मधुमेह असणाऱ्यांनी गुळाकडे साखरेचा सुरक्षित पर्याय म्हणून पाहावे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

मधुमेहामध्ये रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात ठेवणे अत्यंत महत्त्वाचे असते. यासाठी नियमित शारीरिक हालचाल, योग्य आहार, कर्बोदकांचे प्रमाण नियंत्रित ठेवणे आणि डॉक्टरांनी सांगितलेली औषधे वेळेवर घेणे आवश्यक असते. विशेषतः गोड पदार्थ आणि अतिरिक्त साखरेचे सेवन कमी करण्याचा सल्ला दिला जातो.

पण साखर सोडून त्याऐवजी गूळ वापरणाऱ्यांची संख्या मोठी आहे. गूळ नैसर्गिक आहे, त्यावर पांढऱ्या साखरेसारखी प्रक्रिया होत नाही आणि त्यामुळे तो आरोग्यासाठी चांगला असावा असा समज अनेकांच्या मनात असतो. मात्र, मधुमेहाच्या बाबतीत चित्र काहीसे वेगळे असू शकते.

### गूळ खाऊनही रक्तातील साखर का वाढली?

दिल्लीतील इंद्रप्रस्थ अपोलो रुग्णालयातील अंतःस्रावतज्ज्ञ डॉ. सप्तर्षी भट्टाचार्य यांनी एका ४२ वर्षीय महिलेबाबतचा अनुभव सांगितला. या महिलेला नुकताच प्रकार-२ मधुमेह असल्याचे निदान झाले होते. रक्तातील साखर नियंत्रणात आणण्यासाठी त्यांनी पांढरी साखर पूर्णपणे आहारातून काढून टाकली आणि तिच्या जागी गुळाचा वापर सुरू केला. त्यांना गूळ हा नैसर्गिक आणि सुरक्षित पर्याय वाटत होता. त्यामुळे सकाळच्या चहात गूळ घालणे, स्वयंपाकात गुळाचा वापर करणे आणि दुपारच्या जेवणानंतर गोड खाण्याची इच्छा झाली की गुळाचा छोटा तुकडा खाणे असा त्यांचा दिनक्रम होता.

विशेष म्हणजे त्या नियमित चालत होत्या, आहाराची काळजी घेत होत्या आणि मधुमेह नियंत्रणासाठी आवश्यक नियम पाळत होत्या; तरीही रक्तातील साखरेची पातळी कमी होण्याऐवजी वाढत होती. तीन महिन्यांनंतर तपासणी केली असता त्यांचा HbAlc ७.२ टक्क्यांवरून ८.५ टक्क्यांवर पोहोचला. आहाराचा सविस्तर आढावा घेतल्यानंतर दिवसातून अनेक वेळा गूळ खाल्ला जात असल्याचे लक्षात आले. डॉक्टरांच्या मार्गदर्शनानुसार गुळाचे सेवन बंद केल्यानंतर पुढील तीन महिन्यांत HbAlc ७ टक्क्यांपर्यंत कमी झाला.

### HbAlc म्हणजे नेमके काय?

HbAlc ही मधुमेह समजून घेण्यासाठी केली जाणारी महत्त्वाची रक्तचाचणी आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर या चाचणीमुळे मागील साधारण दोन ते तीन महिन्यांतील रक्तातील साखरेची सरासरी पातळी किती होती याचा अंदाज येतो. एखाद्या दिवशी रक्तातील साखर कमी किंवा जास्त असू शकते. मात्र, HbAlc त्या दिवसापुरती स्थिती न सांगता काही महिन्यांतील रक्तातील साखरेच्या नियंत्रणाचे व्यापक चित्र दाखवते, त्यामुळे मधुमेह नियंत्रणात आहे की नाही हे तपासण्यासाठी डॉक्टर या चाचणीचा आधार घेतात.

### नैसर्गिक गूळ असला तरी मधुमेहात सावधगिरी का?

गूळ ऊसाच्या रसापासून तयार केला जातो. पांढऱ्या साखरेपेक्षा त्याची निर्मिती प्रक्रिया वेगळी असली तरी त्यामध्ये मोठ्या प्रमाणात साखर असते, त्यामुळे गूळ म्हणजे साखरेपासून पूर्णपणे वेगळा आणि रक्तातील साखर न वाढवणारा पदार्थ असा समज चुकीचा ठरू शकतो. गुळाचा वापर चहा, लाडू, चिक्की, तिळगूळ, गुळाचा हलवा किंवा विविध गोड पदार्थांमध्ये केला जातो. नैसर्गिक आहे म्हणून गूळ अधिक प्रमाणात खाण्याची सवय लागली तर एकूण साखरेचे सेवन वाढू शकते. परिणामी रक्तातील साखरेचे नियंत्रण बिघडण्याची शक्यता असते.

वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मते गूळ नैसर्गिक असला तरी मधुमेहाच्या दृष्टीने त्याचा परिणाम साखरेसारखाच होऊ शकतो. त्यामुळे पांढरी साखर बंद करून गूळ अमर्याद प्रमाणात घेणे हा मधुमेह नियंत्रणाचा योग्य मार्ग मानता येणार नाही.

### गूळ खाल्ल्याने कोणते धोके वाढू शकतात?

मधुमेहामध्ये रक्तातील साखर दीर्घकाळ वाढलेली राहिल्यास हृदय, मूत्रपिंड, डोळे आणि मज्जातंतू यांसारख्या अवयवांवर परिणाम होण्याचा धोका वाढू शकतो, त्यामुळे केवळ साखर बंद केली म्हणून मधुमेह नियंत्रणात आला असे मानणे योग्य नाही. आहारात गुळाचा वारंवार आणि जास्त प्रमाणात वापर केल्यास एकूण साखर आणि उष्मांकाचे सेवन वाढू शकते. त्याचा परिणाम वजन, पोटावरील चरबी आणि रक्तातील साखरेच्या नियंत्रणावर होऊ शकतो, त्यामुळे मधुमेह असणाऱ्यांनी गूळ हा साखरेचा पूर्णपणे सुरक्षित पर्याय आहे असे गृहीत धरू नये.

थोडक्यात नैसर्गिक म्हणजे नेहमीच मधुमेहासाठी सुरक्षित असे नाही. गूळ किती प्रमाणात घ्यायचा, घ्यायचा की नाही आणि आहारात त्याचा समावेश कसा करायचा, हे प्रत्येकाच्या रक्तातील साखरेची पातळी, औषधे, वजन आणि एकूण आरोग्य लक्षात घेऊन डॉक्टर किंवा आहारतज्ज्ञांच्या सल्ल्याने ठरवणे अधिक योग्य ठरते.



# तांदूळ धुण्याची योग्य पद्धत कोणती?

## ‘या’ चुका केल्यास भात होईल चिकट आणि चवहीन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रोजच्या जेवणात भात शिजवण्यापूर्वी तांदूळ धुणे ही प्रत्येक घरातील एक अत्यंत सामान्य प्रक्रिया आहे. मात्र, तुम्ही तांदूळ योग्य पद्धतीने धुवता का?अनेक लोक तांदळात एकदाच पाणी घालून ते लगेच ओततात, तर काही जण तांदूळ इतक्या जोराने चोळतात की तांदळाचे दाणेच तुटतात. तांदूळ धुण्याची योग्य पद्धत माहीत असल्यास त्यातील धूळ-माती तर निघून जातेच, शिवाय शिजल्यानंतर भात अगदी मोकळा आणि सुटसुटीत होतो.

### तांदूळ धुणे का गरजेचे आहे?

शेतापासून ते थेट आपल्या स्वयंपाकघरापर्यंत पोहोचताना तांदूळ अनेक प्रक्रियांमधून जातो. या काळात त्यात धूळ किंवा मातीचे बारीक कण जाऊ शकतात. याशिवाय, पॅकेटमधील तांदळाचे दाणे एकमेकांवर घासल्यामुळे त्यांच्या पृष्ठभागावर बारीक स्टार्चची (Starch) पावडर जमा होते. जर तांदूळ न धुता थेट शिजवला, तर भात खूपच चिकट, गिच्च किंवा पचायला जड होऊ शकतो.

### तांदूळ धुण्याची योग्य आणि सोपी पद्धत

भांड्यात धुणे : तांदूळ एका मोठ्या भांड्यात घेऊन त्यात पूर्ण दाणे बुडतील इतके पाणी घाला. हलक्या हाताने तांदूळ फिरवा. पाणी लगेच पांढरट किंवा गढूळ दिसेल. ते पाणी काढून पुन्हा नवीन पाणी टाका.

पाणी स्वच्छ होईपर्यंत धुणे : ही प्रक्रिया २ ते ३ वेळा करा, जोपर्यंत पाणी बऱ्याच अंशी स्वच्छ दिसत नाही. पाणी अगदी काचेसारखे पारदर्शक होण्याची गरज नाही, थोडा गढूळपणा राहू शकतो.

चाळणीचा वापर : जर तुम्ही भांड्यात तांदूळ धुणे पसंत करत नसाल, तर बारीक जाळीच्या चाळणीत तांदूळ ठेवून त्यावर नळाचे स्वच्छ पाणी सोडूनही तांदूळ धुता येतात.



### तांदूळ धुताना ‘या’ चुका टाळा

जोराने चोळू नका : तांदूळ हाताने खूप जोरात चोळल्यास दाणे तुटतात आणि आवश्यकतेपेक्षा जास्त स्टार्च बाहेर पडतो, ज्यामुळे भात खराब होतो.

धुणे आणि भिजवणे वेगळे : तांदूळ धुणे म्हणजे केवळ धूळ आणि स्टार्च काढणे. तांदूळ भिजवण्याचा उद्देश भात लवकर आणि मऊ शिजवणे हा असतो. त्यामुळे केवळ धुण्यासाठी तांदूळ पाण्यात तासन् तास ठेवू नका.

पोषणमूल्ये कमी होऊ देऊ नका : तांदूळ वारंवार आणि अतिप्रमाणात धुतल्याने पाण्यामध्ये विरघळणारी जीवनसत्त्वे (विशेषतः व्हिटॅमिन बी) कमी होऊ शकतात. त्यामुळे २ ते ३ वेळा हलक्या हाताने धुण पुरेसे आहे.

### तांदूळ धुतल्याने आर्सेनिक पूर्णपणे निघते का?

तांदळात आढळणारे आर्सेनिक हा एक वेगळा विषय आहे. फक्त तांदूळ नेहमीच्या पद्धतीने धुतल्याने त्यातील आर्सेनिकचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी होत नाही. त्यासाठी तांदूळ शिजवण्याची पद्धत (उदा. जास्त पाण्यात शिजवून पाणी काढून टाकणे) अधिक प्रभावी ठरते. त्यामुळे केवळ तांदूळ धुणे हा यावर पूर्ण उपाय मानू नये.

# मोदकाचे सारण कसे बनवायचे? जाणून घ्या रेसिपी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गणपती बाप्पांच्या आगमनाची चाहूल लागली की घराघरात मोदक बनविण्याची तयारी सुरू होते. बाप्पांना प्रिय असलेला मोदक म्हणजे भक्ती, प्रेम आणि गोडवा यांचे सुंदर प्रतीक. उकडीचे मोदक बनवताना बाहेरचे आवरण मऊ, पातळ आणि सुबक असणे जितके महत्त्वाचे आहे तितकेच ओल्या नारळाचे सारण योग्य पद्धतीने बनवणे महत्त्वाचे आहे. सारण खूप ओलसर झाले, तर मोदक फुटू शकतो आणि सारण खूप कोरडे झाले, तर मोदकाची चव आणि पोत बिघडू शकतो. आपण ओल्या नारळाचे सारण आणि उकडीचे सुबक मोदक अगदी सोप्या पद्धतीने कसे बनवायचे ते पाहणार आहोत. ही रेसिपी Sush Love Niks यांच्या शेअर केलेल्या पद्धतीवर आधारित आहे. विशेष म्हणजे सारण तयार करताना कोणत्या छोट्या चुका टाळायच्या, याकडे आपण खास लक्ष देणार आहोत.


### ओल्या नारळाच्या सारणासाठी लागणारे साहित्य

* २ वाट्या ताजा किसलेला ओला नारळ
* १ ते ११/४ वाटी किसलेला गूळ
* १ ते २ चमचे खसखस
* १/२ चमचा वेलची पूड
* चिमूटभर जायफळ पूड
* आवडीनुसार काजू, बदाम किंवा इतर ड्रायफ्रूट्स
* १ चमचा तूप

सारणासाठी शक्यतो ताजा आणि चांगल्या प्रतीचा ओला नारळ वापरावा. नारळ फार जास्त पाणचट असेल तर सारण शिजायला वेळ लागू शकतो. गुळाचा रंग आणि चव यानुसार सारणाचा रंग थोडा बदलू शकतो.

### ओल्या नारळाचे सारण कसे बनवायचे?

सर्वप्रथम कढई गॅसवर ठेवून त्यात थोडे तूप घाला. तूप गरम झाल्यावर त्यात खसखस घालून हलकी परतून घ्या. खसखस जास्त भाजू नका. फक्त तिचा मंद सुगंध येईपर्यंत परतली तरी पुरेसे आहे.यानंतर त्यात किसलेला ओला नारळ घाला. नारळ आणि खसखस चांगली मिसळून घ्या. सुरूवातीला नारळातील ओलावा बाहेर येईल. त्यामुळे मिश्रण थोडे ओलसर दिसेल. आता त्यात किसलेला गूळ घाला. गूळ घातल्यानंतर मिश्रण सतत किंवा अधूनमधून हलवत राहा. गूळ वितळताना नारळाला पाणी सुटल्यासारखे दिसेल. घाबरू नका; ही



प्रक्रिया सामान्य आहे.

### सारण खूपवेळ शिजवू नका

इथेच अनेकांकडून एक छोटी चूक होते गूळ आणि नारळाचे मिश्रण खूप वेळ शिजवले जाते. त्यामुळे सारण खूप कोरडे आणि कडक होऊ शकते. मोदकासाठी सारण मऊ पण घट्ट असणे आवश्यक आहे. मिश्रणाचा रंग थोडा बदलू लागला आणि अतिरिक्त ओलावा कमी झाला की त्यात वेलची पूड आणि चिमूटभर जायफळ पूड घाला. आवडत असल्यास बारीक चिरलेले काजू-बदाम किंवा इतर ड्रायफ्रूट्स घालू शकता. ड्रायफ्रूट्स घालणे अनिवार्य नाही; मात्र त्याने सारणाला छान कुरकुरीतपणा आणि स्वाद मिळतो.

### कढईला चिकटू नये म्हणून हलवत राहा

सारण कढईला चिकटू नये म्हणून हलवत राहा. जेव्हा मिश्रण एकत्र येऊन कढईच्या तळापासून थोडे सुटू लागेल, तेव्हा गॅस बंद करा. सारण पूर्णपणे कोरडे करू नका. गॅस बंद केल्यानंतरही कढईच्या उष्णतेमुळे ते थोडे शिजत राहते. त्यामुळे किंचित ओलसर असतानाच गॅस बंद करणे योग्य ठरते. सारण एका ताटात काढून पूर्णपणे थंड होऊ द्या.

### मोदकाची उकड तयार करण्याची पद्धत

आता मोदकासाठी उकड तयार करूया. एका भांड्यात पाणी घ्या. त्यात थोडे मीठ आणि साधारण एक चमचा तूप घाला. पाणी उकळू लागल्यावर त्यात तांदळाचे पीठ घाला. गॅस कमी करून पीठ पाण्यात नीट मिसळा. झाकण ठेवून काही मिनिटे वाफ येऊ द्या. त्यानंतर मिश्रण एका परातीत किंवा ताटात काढा. हाताला थोडे पाणी किंवा तूप लावून उकड चांगली मळून घ्या. उकडीत गुठळ्या राहू देऊ नका. उकड जितकी मऊ आणि एकसंध असेल, तितके मोदक बनवताना सोपे जातील. जर उकड खूप कोरडी वाटत असेल तर थोडं गरम पाणी हाताला लावून मळा. मात्र एकदम जास्त पाणी घालू नका.

### सुबक मोदक कसे वळायचे?

उकडीचा एक छोटा गोळा घ्या आणि हाताच्या तळव्याने किंवा बोटांच्या मदतीने त्याची छोटी वाटी तयार करा. ही वाटी शक्य तितकी पातळ करा; मात्र मध्ये किंवा कडेवर भेगा पडू देऊ नका. आता त्यात तयार केलेले थंड सारण भरा. सारण जास्त भरू नका. जास्त सारण भरल्यास मोदक बंद करताना कडा फुटण्याची शक्यता असते. यानंतर बोटांच्या मदतीने मोदकाला पाकळ्या पाडा आणि सर्व पाकळ्या वरच्या बाजूला एकत्र करून टोक बंद करा. अशा प्रकारे एक सुंदर, सुबक मोदक तयार होईल. सगळे मोदक तयार झाल्यानंतर त्यांना वाफवण्यासाठी मोदकपात्रात किंवा इडलीच्या भांड्यात पाणी गरम करा. मोदकांना चाळणीवर किंवा वाफवण्याच्या ताटावर ठेवण्यापूर्वी त्याखाली हलके तेल किंवा पाणी लावू शकता.

### ही छोटी चूक अजिबात करू नका!

मोदकाचे सारण बनवताना सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे नारळ आणि गूळ खूप जास्त वेळ शिजवू नका. सारण पूर्ण कोरडे केल्यास मोदकातील भराव घट्ट होतो आणि मोदकाची चवही कमी होते.तसंच सारण पूर्ण गरम असताना मोदकात भरू नका. सारण पूर्णपणे थंड झाल्या वरच मोदक भरावेत. गरम सारणामुळे उकड नरम पडू शकते आणि मोदक व्यवस्थित वळता येत नाही. उकड तयार करताना तांदळाचे पीठ आणि पाणी यांचे प्रमाणही योग्य असणे महत्त्वाचे आहे. उकड खूप घट्ट झाली तर मोदकाला पाकळ्या पाडताना कडा तुटू शकतात आणि उकड खूप सैल झाली तर मोदकाचा आकार टिकत नाही.




# सिद्ध मंगल स्तोत्राचे महत्त्व आणि लाभ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रीपाद श्रीवल्लभ सन १३२० मध्ये गणेश चतुर्थीला अवतरले. त्यांचा पहिलाच वाढदिवस होता. अप्पलराज शर्मा व माता सुमती श्रीपादांना घेऊन आजोबा बापन्नाचार्यांच्या घरी गेले होते. बाल श्रीपादांना मांडीवर घेऊन आजोबा श्रीपादांच्या श्रीचरणांच्या तळावरील पद्म निरखून पाहत होते. ती शुभलक्षणे दिसताच श्रीपादांचे चरण विजेसारखी लखलखू लागत. त्यामुळे बापन्नाचार्यांना ती स्पष्ट दिसत नव्हती. पण दुसऱ्या दिवशी पहाटे तांदूळ कुटल्याने उडालेल्या कोंड्यात बापन्नाचार्यांना दिव्य पादमुद्रा दिसल्या. त्यांनी सुमती महाराणीला विचारले की बेटा यावरून कोण चालत गेले? सुमती माता म्हणाल्या, की दुसरे कोण! तुमचा लाडका नातू! पण त्या पादमुद्रा सोळा वर्षांच्या युवकाच्या वाटत होत्या. आजोबांनी श्रीपादांना मांडीवर घेतले व त्यांचे श्रीचरण पाहताच त्यावर सर्व शुभलक्षणे स्पष्ट दिसत होती जी श्रीपाद दत्तावतार आहेत याची सूचक होती. बापन्नाचार्यांनी श्रीपादांच्या दिव्य चरणांचा मुका घेतला. हे बालक दत्तप्रभूच आहे, याबद्दल त्यांची खात्री पटली. त्यांच्या नेत्रांतून अश्रूधारा व मुखातून सहजपणे काही पदं बाहेर पडत होती. तेच ते दिव्य सिद्ध मंगल स्तोत्र.

श्रीपाद आजोबांचे अश्रू पुसत सांगतात, की सोळा वर्षांपर्यंत घरी राहणार संसार बंधनातून मुक्त होऊ शकते. इच्छिणाऱ्या मुमुक्षुंवर मला अनुग्रह करायचे आहे. मी चिरंजीव असे तुम्हाला वाटते ते खरे आहे. यावेळी एक वर्षांचे श्रीपाद सांगतात, की मी गोकर्ण क्षेत्राला अधिकाधिक शक्तिवंत करू इच्छितो. या वचनानुसार वयाच्या सोळाव्या वर्षी दि. २५ मे १३३६ रोजी पिठापूर सोडल्यावर काशी, प्रयाग, सिद्धाश्रम, नेपाळ करून श्रीपाद श्रीवल्लभ गोकर्ण महाबळेश्वर येथे आले व त्यांनी तीन वर्षे येथे वास्तव्य केले. याच वास्तव्यात बाल रामचंद्र योगेश्वर (ज्यांची नृसिंहवाडी येथे मनोहर पादुकांच्या मागे संजीवनी समाधी आहे) यांना श्रीपादांनी ताब्यात घेऊन संगोपन केले.



श्रीपादांनी आजोबांना सांगितले, की तुम्ही सौर शक्तिपात केलेले श्रीशैल्य मल्लिकार्जुन शिवलिंग मी अधिक शक्तिशाली करणार आहे. त्यानुसार गोकर्ण येथील तीन वर्षांच्या वास्तव्यानंतर श्रीपाद तडक श्रीशैल्य येथे आले व त्यावेळी त्यांनी येथे चार महिने वास्तव्य केले. या काळात श्रीपाद तेजोरूपात सूर्यलोकात, हिरण्य लोकात, सप्तर्षी लोकात जाऊन आले. तसेच श्रीशैल्य क्षेत्रातील पात्र ऋषींना त्यांनी सप्तर्षी लोकात नेऊन स्थानापन्न केले.

श्रीपादांनी आजोबांना सांगितले, की नृसिंह सरस्वती म्हणून अवतरल्यानंतर कर्दळीवनात तीनशे वर्षे तप करून प्रज्ञापूरला (अक्कलकोट) स्वामी समर्थ म्हणून राहिल्यानंतर मल्लिकार्जुन शिवलिंगात विलीन होणार आणि खरोखरच सन १८७८ मध्ये स्वामी समर्थ रूपाची समाधी झाल्यावर श्रीपाद श्रीवल्लभ आठ वर्षे म्हणजे सन १८७८ ते १८८६ या काळात मल्लिकार्जुन शिवलिंगात गुप्त राहिले. १८८६ मध्ये रामकृष्ण परमहंस देह सोडतेवेळी साईबाबांना कोलकात्याला धक्षिणेश्वरी काली मंदिरात बोलावून घेण्यात आले व तेथे रामकृष्ण परमहंसांच्या शिष्यांची जवाबदारी साईबाबांना देण्यात आली. कालीमाता म्हणजे श्री वासवी कन्यका परमेश्वरी कन्यकांबा व श्रीपादांनी स्वतःला साईबाबांमध्ये निक्षेपित केले.

साईबाबांचे ते पडक्या, मातीच्या मशिदीत राहणे, कफनी घालणे, भिक्षा मागणे, यवनी भाषा बोलणे यावरून जर कोणी त्यांच्या बद्दल काही समज करून घेत असेल ते खूप गैर आहे. साई अवतार हा मानवी आकलनाच्या खूप पलीकडील आहे.

**स्तोत्राचे स्वरूप आणि अर्थाची झलक**

या स्तोत्रात एकूण ९ श्लोक आहेत. प्रत्येक श्लोकाच्या शेवटी 'जय विजयीभव, दिग्विजयीभव, श्रीमदखंड श्री विजयीभव' हा जयघोष येतो. या स्तोत्रातून श्रीपाद श्रीवल्लभ महाराजांच्या घराण्याचा, त्यांच्या जन्माचा आणि त्यांच्या दिव्य रूपाचा महिमा गायला आहे.

**पहिले तीन श्लोक :** यात श्रीपाद महाराजांचे वडील 'अप्पल लक्ष्मी नरसिंह राजा' आणि माता 'सुमती महाराणी' यांच्या वात्सल्याचा उल्लेख आहे.पुढील श्लोकः यात आजोबा बापनाचार्युलु आणि आजी राजमांबा यांच्या भाग्याचे वर्णन आहे, ज्यांच्या कुळात प्रत्यक्ष दत्ताने जन्म घेतला.अंतिम श्लोकः यात पीठापूर क्षेत्री चालणाऱ्या श्रीपाद महाराजांच्या नित्य विहाराचे आणि त्यांच्या मंगलकारी रूपाचे गुणगान केले आहे.

**सिद्धमंगल स्तोत्राचे महत्त्व आणि लाभ**

श्रीपाद श्रीवल्लभ स्वामींनी स्वतः या स्तोत्राचे महत्त्व सांगितले आहे. चरित्रामृतानुसार जो व्यक्ती या स्तोत्राचे मनोभावे पठण करतो, त्याला खालील फळे मिळतात.

**अडचणींचे निवारण :** जीवनातील सर्व प्रकारचे मानसिक, शारीरिक त्रास आणि संकटे दूर होतात.

**सिद्धपुरुषांचे दर्शन :** या स्तोत्राच्या नियमित जपाने साधकाला गुप्त रूपात वावरणाऱ्या सिद्धपुरुषांचे किंवा योग्यांचे दर्शन घडते.

**महापुण्याचे फळ :** या स्तोत्राच्या केवळ एक आवर्तनाने 'अनाघाष्टमी व्रत' केल्याचे आणि 'हजारो सत्पात्री ब्राह्मणांना भोजन' घालण्याचे पुण्य प्राप्त होते, असा उल्लेख फलश्रुतीत आढळतो. दत्त संप्रदायात आणि विशेषतः श्रीपाद श्रीवल्लभ महाराजांच्या उपासनेत या स्तोत्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**श्रीपाद श्रीवल्लभांचा जयजयकार असो.**

# कलियुगातील पहिले दत्तावतार : श्रीपाद श्रीवल्लभ स्वामी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कलियुगातील पहिले दत्तावतार श्रीपाद श्रीवल्लभ स्वामी यांचा जन्म इसवी सन १३२० मध्ये भाद्रपद शुद्ध चतुर्थी अर्थात गणेश चतुर्थीच्या दिवशी आंध्र प्रदेशातील पूर्व गोदावरी जिल्ह्यातील पिठीकापूर (पीठापूर) येथे झाला. त्यांचा जन्मोत्सव यंदा दि. १४ व १५ सप्टेंबर २०२६ असे दोन दिवस तेथे साजरा केला जात आहे. त्यानिमित्त...

'कृते जनार्दनो देवस्त्रेतायां रघुनन्दनः। द्वापारे रामकृष्णौ च कलौ श्रीपाद वल्लभः॥' या श्लोकाप्रमाणे कलियुगामध्ये मानवाच्या कल्याणासाठी आणि धर्मसंस्थापनेसाठी साक्षात भगवान दत्तात्रेयांनी घेतलेला पहिला पूर्ण आणि दिव्य अवतार म्हणजे 'श्रीपाद श्रीवल्लभ स्वामी'. अंधारलेल्या कलियुगात भक्तांना अचूक मार्ग दाखविण्यासाठी आणि आध्यात्मिक चेतना जागृत करण्यासाठी स्वामींचे या पृथ्वीवर भाद्रपद शुद्ध चतुर्थीला चित्रा नक्षत्रावर साक्षात ज्योतिरूपाने आगमन झाले. त्यांच्या मातोश्रींचे नाव सुमती महाराणी आणि पित्याचे नाव अप्पलराज शर्मा होते. त्यांच्या जन्मावेळी वातावरणात दिव्य नाद आणि शुभ चिन्हे दिसून आली होती. त्यांच्या पायावर दैवी चिन्हे (पद्म इत्यादी) असल्याने त्यांचे नाव 'श्रीपाद' ठेवण्यात आले.

स्वामींनी वयाच्या सातव्या वर्षापर्यंतच वेद, शास्त्र आणि उपनिषदांचे ज्ञान आत्मसात केले होते. त्यांनी औपचारिक शिक्षण घेतले नाही. कारण ते स्वतः ज्ञानस्वरूप होते. सोळाव्या वर्षी विवाहाचा प्रसंग आला असता त्यांनी आपण 'वैराग्यस्त्री'शी विवाहबद्ध असल्याचे सांगून गृहत्याग केला आणि ते देश भ्रमणासाठी निघाले. कार्य आणि कर्मभूमी (कुरवपूर क्षेत्र) संपूर्ण भारतवर्षाची परिक्रमा केल्यानंतर स्वामी कर्नाटकातील रायचूरजवळील कृष्णा नदीच्या पात्रात असलेल्या कुरवपूर (कुरुगड्डी) या बेटावर स्थायिक झाले. कुरवपूर हीच त्यांची मुख्य कर्मभूमी बनली. येथे त्यांनी चौदा वर्षे कठोर तपश्चर्या केली आणि असंख्य भक्तांचे कल्याण केले. त्यांनी जातिभेद आणि अंधश्रद्धा निर्मूलनासाठी अनेक चमत्कार केले, गरिबांना व वंचितांना न्याय दिला आणि लोकांमध्ये भक्तीचा प्रसार केला.

'श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृत' ग्रंथाचे महत्त्व स्वामींच्या दिव्य लीलांचे वर्णन करणारा 'श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृत' हा ग्रंथ दत्त संप्रदायात अत्यंत पवित्र मानला जातो. हा ग्रंथ मूळ समकालीन लेखक शंकर भट्ट यांनी लिहिला होता. या ग्रंथाचे श्रवण, पठण आणि पारायण केल्याने भक्तांच्या जीवनातील सर्व संकटे, रोग आणि मानसिक त्रास दूर होतात, अशी भक्तांची गाढ श्रद्धा आहे.

## जन्मोत्सव आणि महत्त्व

गणेश चतुर्थीच्या शुभ मुहूर्तावर स्वामींचा जन्मोत्सव असतो. या दिवशी दत्त भक्त उपवास धरतात. स्वामींच्या प्रतिमेचे व पादुकांचे पूजन करतात आणि 'श्रीपादराजं शरणं प्रपद्ये' या मंत्राचा जप करतात. पीठापूर येथील महासंस्थानमध्ये या काळात विशेष उत्सव, अभिषेक, पालखी सोहळा आणि लक्षावधी भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले जाते. स्वामींनी अवघ्या ३० वर्षांच्या आयुष्यात आपले कार्य पूर्ण केले आणि आश्विन वद्य द्वादशीला (गुरुद्वादशी) ते कुरवपूर येथे गुप्त झाले. जरी ते देहरूपाने आपल्यात नसले, तरी ते आजही तेजोरूपाने भक्तांच्या हाकेला धावून येतात आणि त्यांच्या पाठीशी उभे राहतात.

# आज ऋषी पंचमी : काय आहे महत्त्व?

## जाणून घ्या पूजा साहित्य आणि मांडणी कशी करावी?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पापांपासून मुक्ती देणारे व्रत म्हणून ओळखले जाणारे व्रत म्हणजे ऋषी पंचमी. मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी म्हणजेच मंगळवारी ऋषी पंचमी आहे. गणेश चतुर्थीच्या दुसऱ्या दिवशी हे व्रत करतात. हिंदू धर्मातील अत्यंत महत्त्वाचे असे हे ऋषी पंचमी व्रत भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षाच्या पंचमी तिथीला करतात.



**ऋषी पंचमी व्रत विधी**

शास्त्रामध्ये असे सांगितले आहे, की ऋषी पंचमीच्या दिवशी घर स्वच्छ करा. सात ऋषींसोबतच देवी अरुंधतीचीही विधीवत स्थापना करा. हळद, चंदन, फुले, अक्षता इत्यादींनी सात ऋषींची पूजा करा. पूर्ण विधीवत पूजा केल्यानंतर ऋषी पंचमी व्रत कथा ऐका.

**ऋषी पंचमीची व्रत कथा**

आख्यायिकेनुसार असे सांगितले जाते, की एक उत्तरा नावाचा ब्राह्मण होता. तो सुशीला नावाच्या पत्नीसोबत राहत होता. त्याची मुलगी विधवा झाली होती आणि त्यामुळे त्याच्यासोबतच राहत होती. एका रात्री मुलीच्या संपूर्ण शरीराला मुंग्या लागल्या. या गघटनेने तिचे आई-वडील चिंतेत बुडाले. त्यानी हा प्रकार एका ऋषीला सांगतला. त्यानंतर ऋषींनी सांगितले, की त्यांच्या मुलीने तिच्या मागील जन्मात मासिक पाळीच्या काळात पाप केले होते. त्याची शिक्षा तिला आता शरीरावर मुंग्या लागून मिळत आहे. ऋषींनी पापांच्या मुक्तीसाठी त्या ब्राम्हण कन्येला ऋषी पंचमीचे व्रत करण्यास सांगितले. ब्राह्मण कन्येने ऋषी पंचमीचे व्रत केल्याने तिचे सर्व कष्ट दूर झाले. तिला सर्व पापांपासून मुक्ती मिळाली आणि पुढच्या जन्मात सौभाग्य प्राप्त झाले.

## ऋषी पंचमी पूजा पद्धत

* ऋषी पंचमीची पूजा करण्यासाठी महिलांनी सकाळी सूर्योदयापूर्वी पवित्र गंगा नदीत स्नान करावे.
* घरातील पाण्यात गंगाजल टाकूनही स्नान करू शकता.
* पूजेच्या ठिकाणी शेण सारवून चौकोनी वर्तुळ करून त्यावर सात ऋषी काढा.
* सप्त ऋषींना दूध, दही, तूप, मध आणि पाण्याने अभिषेक करा.
* गंध, तांदूळ, उदबत्ती, दिवा इत्यादींनी पूजा करावी.
* पूजा करताना हा मंत्र वाचा - कश्यपोत्रिर्भरद्वाजो विश्वामित्रोय गौतमः।जमदग्निर्वसिष्ठश्च सप्तैते ऋषयः स्मृताः।। गृह्णन्त्वर्ध्य मया दत्तं तुष्टा भवत मे सदा।।
* मासिक पाळीच्या काळात धार्मिक कार्यात काही चूक झाली असेल तर त्याबद्दल महिलांनी माफी मागितली पाहिजे.

यानंतर कथा श्रवण करून तूप लावून होम करावा. या दिवशी ब्राह्मणाला केळी, तूप, साखर आणि केळी दान करा. तसेच आपल्या क्षमतेनुसार दक्षिणा देणेही शुभ आहे.

# 'या' राशींचे लोक नुसता पैसा गोळा करणार!

## बुधाने उत्तराफाल्गुनी नक्षत्र सोडल्याने येणार अफाट पैसा, बँक बॅलन्स झपाट्याने वाढणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज्योतिषशास्त्रात बुध ग्रहाला बुद्धी, वाणी, तर्क, गणना, व्यापार आणि आर्थिक व्यवहारांचा कारक मानले जाते. त्यामुळे बुधाच्या हालचालींत किंवा नक्षत्रात बदल झाला की, त्याचा प्रभाव सर्व राशींवर कमी-अधिक प्रमाणात पडू शकतो, अशी ज्योतिषशास्त्रीय मान्यता आहे. आता १३ सप्टेंबर २०२६ रोजी बुध एका महत्त्वाच्या नक्षत्रातून दुसऱ्या नक्षत्रात प्रवेश करणार आहे. या बदलामुळे विशेषतः तीन राशींच्या लोकांसाठी पैसा, करिअर आणि व्यवसायाच्या दृष्टीने अनुकूल शक्यता निर्माण होऊ शकतात. विशेष म्हणजे हा बदल आज सकाळी १० वाजून ४७ मिनिटांनी होणार आहे. बुध उत्तराफाल्गुनी नक्षत्रातून बाहेर पडून चंद्राच्या हस्त नक्षत्रात प्रवेश करील. ज्योतिषीय गणनेनुसार बुधवार, २१ सप्टेंबरपर्यंत हस्त नक्षत्रात राहण्याची शक्यता आहे. त्यानंतर तो चित्रा नक्षत्रात प्रवेश करील.



**वृषभ :** आर्थिक बाबतीत काही सकारात्मक घडामोडींचे संकेत मिळू शकतात. काही दिवसांपासून रखडलेले काम पुन्हा मार्गी लागण्याची शक्यता आहे. उत्पन्नाचा एखादा नवीन मार्ग खुला होऊ शकतो किंवा अतिरिक्त कमाईची संधी समोर येऊ शकते. एखाद्या जुन्या प्रकल्पातून आर्थिक फायदा मिळण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. नोकरी करणाऱ्यांना वरिष्ठांकडून आपल्या कामाची दखल घेतली जाण्याची शक्यता आहे. कार्यालयातील एखादी महत्त्वाची जबाबदारी मिळू शकते आणि त्यातून स्वतःची क्षमता सिद्ध करण्याची संधी मिळू शकते. व्यवसाय करणाऱ्यांसाठी नवीन ग्राहक जोडले जाणे, जुने व्यावसायिक संपर्क पुन्हा सक्रिय होणे किंवा एखादी फायदेशीर संधी मिळणे शक्य आहे.



**मिथुन :** बुध हा या राशीचा स्वामी असल्याने नक्षत्र परिवर्तनाचा काळ विशेष महत्त्वाचा मानला जातो. या काळात विचार करण्याची क्षमता अधिक प्रभावी होण्याची शक्यता असून, एखाद्या गुंतागुंतीच्या विषयावर योग्य निर्णय घेता येऊ शकतो. नोकरीच्या शोधात असणाऱ्यांना नवीन संधी मिळण्याचे संकेत आहेत. मुलाखत, बैठक किंवा महत्त्वाची चर्चा यांमध्ये प्रभावीपणे आपले मत मांडता येऊ शकते. व्यवसाय करणाऱ्यांसाठी नवीन ग्राहक किंवा व्यावसायिक भागीदार जोडले जाण्याची शक्यता आहे. पूर्वी केलेल्या संपर्कातून एखादी महत्त्वाची संधी मिळू शकते. पैशांशी संबंधित एखादा निर्णय फायदेशीर ठरू शकतो, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.



**सिंह :** करिअरच्या दृष्टीने हा काळ काही चांगल्या संधी घेऊन येऊ शकतो. कामाच्या ठिकाणी जबाबदारी वाढण्याची शक्यता असून, त्यासोबत प्रतिष्ठा आणि मान-सन्मान मिळण्याचे संकेतही आहेत. वरिष्ठांकडून एखाद्या महत्त्वाच्या कामाची जबाबदारी सोपवली जाऊ शकते. मेहनतीचे योग्य कौतुक होण्याची शक्यता असल्याने आत्मविश्वास वाढू शकतो. आर्थिक स्थितीतही सुधारणा होण्याची शक्यता आहे. एखाद्या जुन्या व्यवहारातून पैसे मिळू शकतात किंवा पूर्वी केलेल्या कामाचा फायदा आता मिळण्याची शक्यता आहे. गुंतवणुकीतून लाभ मिळण्याचे संकेत काही ज्योतिषीय गणनांमध्ये दिले जात आहेत. मात्र, कोणतीही गुंतवणूक करण्यापूर्वी प्रत्यक्ष आर्थिक परिस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे.

**विशेष योग का मानला जातो?**

बुधाचा संबंध बुद्धी, संवाद, व्यापार आणि आर्थिक व्यवहारांशी जोडला जात असल्याने त्याचे हस्त नक्षत्रातील संक्रमण ज्योतिषशास्त्रात महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे या काळात काही राशींच्या लोकांना करिअरमध्ये प्रगती, आर्थिक लाभ, नवीन संधी किंवा सामाजिक प्रतिष्ठा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मात्र, प्रत्येक व्यक्तीच्या जन्मकुंडलीनुसार ग्रहस्थिती वेगळी असते. त्यामुळे वरील परिणाम सर्वांवर समान पद्धतीने होतीलच, असे नाही. ही माहिती ज्योतिषशास्त्रीय मान्यता आणि शक्यतांवर आधारित आहे.

# श्रीपाद श्रीवल्लभ १०८ नामावली

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

१) ॐ श्रीपाद श्रीवल्लभ स्वामीने नमः
२) ॐ प्रथम संपुर्ण दत्तावताराय नमः
३) ॐ परमात्मने नमः
४) ॐ त्रिगुणातीत निर्गुण निराकाराय नमः
५) ॐ अनघालक्ष्मी समेत अनघाय नमः
६) ॐ अर्धनारीश्वराय नमः
७) ॐ सवित्रुकाठकचयन पुण्य फलोद्भवाय नमः
८) ॐ राजमांबा बापन्नाचार्य गर्भ पुण्यफल संजाताय नमः
९) ॐ सुमती अप्पलराज नंदनाय नमः
१०) ॐ दिव्य बालकाय नमः
११) ॐ श्रीधर रामराज श्रीविद्याधरी राधा सुरेखा सहोदराय नमः
१२) ॐ शोडष कला प्रपुर्णाय नमः
१३) ॐ नित्य शोडष वर्षाय नमः
१४) ॐ पिठीकापुर नित्य विहाराय नमः
१५) ॐ सुवर्ण पिठीकापुराधिपतये नमः
१६) ॐ औदुंबर नित्य निवासाय नमः
१७) ॐ व्याघ्रेश्वर चर्मासन स्थिताय नमः
१८) ॐ अग्नीवस्त्रधराय नमः
१९) ॐ दंडकमंडलु मालाधराय नमः
२०) ॐ श्री राखीधराय नमः
२१) ॐअदृश्यहस्ताय नमः
२२) ॐ सुलभ साध्याय नमः
२३) ॐ स्मृतीमात्र प्रसन्नाय नमः
२४) ॐ परम पवित्राय नमः
२५) ॐ परम ज्योतिये नमः
२६) ॐ भाव प्रियाय नमः
२७) ॐ भक्त दासानुदासाय नमः
२८) ॐ भक्तहित कार्याय नमः
२९) ॐ भक्त वत्सलाय नमः
३०) ॐ दिनजनोद्धारकाय नमः
३१) ॐ आपत बांधवाय नमः
३२) ॐ प्रेम शांती दया करुणा मुर्तये नमः
३३) ॐ दुष्टशिक्षकाय शिष्टरक्षकाय नमः
३४) ॐ भवसागर तरणाय नमः
३५) ॐ उग्रशक्ती शांतकराय नमः
३६) ॐ निर्मल अंतःकरणाय नमः
३७) ॐ आर्तत्राण परायणाय नमः
३८) ॐ भुत प्रेत पिशाच निर्मुलकराय नमः
३९) ॐ घटना अघटना समर्थाय नमः
४०) ॐ सर्वतंत्र स्वतंत्राय नमः
४१) ॐ चतुर्भुज भुवन सार्वभौमाय नमः
४२) ॐ अनंतकोटी सुर्य तेजाय नमः
४३) ॐ चंद्रकोटी सुशितलाय नमः
४४) ॐ अखिलांड कोटी ब्रम्हांडनायकाय नमः
४५) ॐ विश्वसाक्षिने नमः
४६) ॐ कालातिताय नमः
४७) ॐ आदीमध्यांत रहीताय नमः
४८) ॐ सर्वग्रह दोष निवारकाय नमः
४९) ॐ कर्म विमोचनाय नमः
५०) ॐ योगेश्वराय नमः
५१) ॐ योगक्षेम कराय नमः
५२) ॐ सर्वयोगमार्ग गम्याय नमः
५३) ॐ योगदेश योगकाल अनुग्रहाय नमः
५४) ॐ अलभ्य योगदाय नमः
५५) ॐ चित्रा नक्षत्राचित संप्रिताय नमः
५६) ॐ नाम स्मरण संतुष्टाय नमः
५७) ॐ पालखी विहार प्रियाय नमः
५८) ॐ नित्य अन्नसंतर्पण प्रियाय नमः
५९) ॐ पादुका पुजा प्रियाय नमः
६०) ॐ अनघाष्टमी व्रत प्रियाय नमः
६१) ॐ दिव्य सिद्ध मंगल स्तोत्र प्रियाय नमः
६२) ॐ अष्टादश वर्ण प्रियाय नमः
६३) ॐ कौतुभ प्रियाय नमः
६४) ॐ अनुष्ठाण प्रियाय नमः
६५) ॐ चरितामृत पारायण व्रत फलप्रदाय नमः
६६) ॐ महदेश्वर्य प्रदाय नमः
६७) ॐ दशमहाविद्या आराधन फलप्रदाय नमः
६८) ॐ सत्यफलीत प्रदाताय नमः
६९) ॐ आयुरारोग्य प्रदाताय नमः
७०) ॐ भोगमोक्ष प्रदायकाय नमः
७१) ॐ कलीकल्मष नाशकाय नमः
७२) ॐ सनातन धर्मस्थापनाय नमः
७३) ॐ पंचतत्व यज्ञ प्रारंभकाय नमः
७४) ॐ दौ चौपाती देव लक्ष्मीगण संख्या बोधकाय नमः
७५) ॐ विश्व चैतन्याय नमः
७६) ॐ विश्व कुंडलीनी जाग्रृतीकराय नमः
७७) ॐ अनंत शक्तीये नमः
७८) ॐ अनंत ज्ञानाय नमः
७९) ॐ महाअनंताय नमः
८०) ॐ सर्वकार्य कारणाधराय नमः
८१) ॐ महाकारणाय नमः
८२) ॐ सत्य सिद्ध संकल्पाय नमः
८३) ॐ दिव्यसत्य प्रतिष्ठीता संकल्पाय नमः
८४) ॐ श्रीपाद महासंस्थान निर्माण संकल्पाय नमः
८५) ॐ महासंकल्पाय नमः
८६) ॐ महातत्वाय नमः
८७) ॐ अत्यंत शांत मायावताराय नमः
८८) ॐ दिव्य भव्य अवताराय नमः
८९) ॐ योग संपुर्ण अवताराय नमः
९०) ॐ चतुर्युगावताराय नमः
९१) ॐ अवतार समाप्त रहित महावताराय नमः
९२) ॐ मुग्ध मनोहर रुपाय नमः
९३) ॐ श्रीमन्महामंगल रुपाय नमः
९४) ॐ श्रीधर्मशास्ताय नमः
९५) ॐ वासवी सहोदराय नमः
९६) ॐ अरुणाचलेश्वराय नमः
९७) ॐ अग्नी स्वरुपाय नमः
९८) ॐ श्रीपद्मावती समेत श्री व्यंकटेश्वर स्वरुपाय नमः
९९) ॐ त्रिमुर्ती स्वरुपाय नमः
१००) ॐ अपरिमीत ब्रम्ह स्वरुपाय नमः
१०१) ॐ समस्त देवी देवता स्वरुपाय नमः
१०२) ॐ विराट स्वरुपाय नमः
१०३) ॐ श्री दत्तात्रेयाय एकैक कलीयुग मुल अवताराय नमः
१०४) ॐ श्रीपाद प्रथम अवतार श्री नरसिंह सरस्वतये नमः
१०५) ॐ श्रीपाद द्वितीय अवतार श्री स्वामी समर्थाय नमः



१०६) ॐ श्रीपाद संकल्प अवतार श्री माणिक्य प्रभवे नमः
१०७) ॐ श्रीपाद वरफलावतार श्रीसाईनाथाय नमः
१०८) ॐ दिगंबराय नमः

॥ श्रीपाद श्रीवल्लभ चरणार्पणमस्तु ॥

(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)